आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पा अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दंडात्मक कार्यवाही करणे करिता अधिकार देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः- आसक-२०१७/प्र.क्र.३२/आपले सरकार कक्ष

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: १७ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.संग्राम-२०१५/प्र. क्र.९३/संग्राम कक्ष, दि.११ ऑगस्ट,२०१६.
२) शुध्दीपत्रक क्र. संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष (आपले सरकार कक्ष), दि.३१ मार्च,२०१७ व दि.१४ डिसेंबर, २०१७.
३) ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय व सीएससी-एसपीव्ही यांमधील त्रिपक्षीय करारनामा दि.१८ नोव्हेंबर, २०१६.
४) दि. २ मार्च, २०१७ रोजी सचिव (ग्रा.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.
५) शासन परिपत्रक क्रमांकः- आसक-२०१७/प्र.क्र.३५/आपले सरकार कक्ष दि.२३ मार्च,२०१७.
६) दि.९ मे, २०१७ रोजी सचिव (ग्रा.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.
७) सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दि.६/९/२०१७ व दि.३१/१०/२०१७.

शासन परिपत्रक

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर त्यांच्या रहिवासी क्षेत्रातच सर्व सेवा कालबध्द स्वरूपात मिळाव्या, या हेतूने राज्यातील पंचायतराज संस्थांमध्ये “आपले सरकार सेवा केंद्र (ASSK)” प्रकल्प राबवण्याचा निर्णय संदर्भिय क्रमांक १ शासन निर्णया अन्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने संदर्भाधीन दि.६/९/२०१७ च्या परिपत्रकान्वये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत “देयक संगणक प्रणालीद्वारे” सीएससी-एसपीव्हीस देयके अदा करण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. सदर कार्यपद्धतीचा शासन स्तरावर वेळोवळी आढावा घेण्यात येत असून सदर कार्यपद्धती राबविण्यात येणाऱ्या अडचणी / त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून देयके अदा करण्याबाबतच्या कार्यपद्धतीमध्ये पुढीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे.

१. उपरोक्त संदर्भित क्रमांक ३ त्रिपक्षीय करारनाम्यानुसार सीएससी-एसपीव्हीने केंद्र स्थापन करण्याचे कळविलेल्या दिवसापासून ६० दिवसाच्या आत केंद्र चालकाची नेमणूक करुन केंद्र कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने असे केंद्र कार्यान्वित न केल्यास करारनाम्यानुसार १० दिवसाच्यावर विलंब झाल्यास १% प्रकल्प व्यवस्थापन खर्चाच्या (रु.४५०/- प्रति केंद्र) दर दिवसाला दंडाच्या स्वरुपात रक्कम त्या त्या महिन्याच्या देयकांमधून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कपात करावी.

२. केंद्र स्तरावरील हार्डवेअरची (संगणक,प्रिंटर,वेब कॅमेरा) दुरूस्ती किंवा दुरुस्ती योग्य नसल्यास ते बदली करुन देण्याची जबाबदारी करारनाम्यानुसार सीएससी-एसपीव्ही ची आहे. जे हार्डवेअर नादुरुस्त असल्याबाबतची तक्रार हेल्प डेस्कवर नोंदवलेली असेल, परंतु २१ दिवसापर्यंत सीएससी-एसपीव्ही ने हार्डवेअर दुरुस्त किंवा बदली न केल्यास ग्रामपंचायतीने त्यांच्या स्वउत्पन्नातून दुरुस्त किंवा बदली करावा व त्यावर आलेला खर्च हा जिल्हा परिषदेला कळवावा. तसेच जिल्हा परिषदेला कळविल्यानंतर तेवढी रक्कम सीएससी-एसपीव्हीच्या त्या महिन्याच्या देयकामधून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दंड स्वरुपात कपात करावी.

३. सीएससी-एसपीव्हीने केंद्राचे वाटप केंद्र चालकाला केल्यानंतरही सदर केंद्र चालक त्या केंद्रावर हजर होत नाही किंवा हजर झाल्यानंतर त्या केंद्रावर नियमित काम करत नाही किंवा सतत गैरहजर राहतो इत्यादी या करणांमुळे अशा केंद्र चालकांचा देय असलेला मोबदला (रु.६०००/-) व सीएससी-एसपीव्हीला (रु.२७००+ १३००+४५०) देय असलेला मोबदल्याची रक्कम सीएससी-एसपीव्हीच्या त्या महिन्याच्या देयकामधून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कपात करावी.

४. उपरोक्त नमुद केलेले १ ते ३ दंडात्मक तरतूदी सीएससी-एसपीव्हीने एका महिन्यात देयक संगणक प्रणालीमध्ये मॅप करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. देयक

संगणक प्रणालीमध्ये दंडात्मक कार्यवाहीची प्रक्रीया मॅप झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मॅन्युअली दंड कपात न करता प्रणाली मध्ये करतील. तो पावेतो अनुक्रमांक १ ते ३ प्रमाणे कार्यवाही देयके अदा करताना करावी.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३१६१८५६४४८८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2018.03.17 11:54:29 +05'30'

(असीम गुप्ता)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
४. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि).
५. सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.
६. सर्व सरपंच ग्रामपंचायत, महाराष्ट्र राज्य (व्दारे केंद्र चालक सी.एस.सी-एस.पी.व्ही).
७. सर्व ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, महाराष्ट्र राज्य (व्दारे केंद्र चालक सी.एस.सी-एस.पी.व्ही/ ई-मेल).
८. सीएससी-एसपीव्ही ई-गव्हर्नन्स इंडिया लिमिटेड, इलेक्ट्रॉनिक निकेतन, तिसरा मजला, DeITY, ६ सीजीओकॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३.
९. माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
१०. स्वीय सहायक सचिव (ग्रा.वि), मा. सचिव (ग्रा.वि) यांचे अवलोकनार्थ.
११. निवड नस्ती, आपले सरकार कक्ष, ग्रामविकास व पंचायत राज विभाग.

प्रत:- माहितीसाठी

१. मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२. सर्व मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य,महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३. मा. राज्यपालांचे सचिव.
४. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव.
५. मा.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय.
६. शासनाचे मुख्य सचिव.
७. शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व प्रशासकीय विभाग).
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व सहसचिव/उपसचिव (ग्रामविकास विभाग).
१०. सर्व जिल्हाधिकारी.
११. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
१२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.